# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र. १७८** **दिनांक ०३/०७/२०२१**

## वेश्या व्यवसायावर कारवाई करुन ०२ पिडित मुलींची केली सुटका, अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकाची कामगिरी

दि. ०२/०७/२०२१ रोजी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे वपोनि. श्री एस. एस. पाटील यांना गोपनीय माहिती मिळाली की, ‘वेश्यादलाल गिता वर्मा हि पुरुष गिऱ्हाईकांकडुन पैसे स्विकारुन पुरुष ग्राहकांना वेश्यागमनाकरीता मुली पुरवित असुन मोन्झीनींज केक शॉप, तुंगा हॉस्पीटल जवळ, मिरा भाईंदर रोड, मिरारोड पूर्व या ठिकाणी वेश्यागमनाकरीता पुरुष गिऱ्हाईकांना मुली पुरविणार आहे. त्यामुळे मिळालेल्या बातमीवरुन वपोनि. श्री. पाटील यांनी पथकासह नमुद ठिकाणी बोगस गिऱ्हाईक व पंच यांना पाठवुन सत्यता पडताळुन छापा टाकला असता महिला वेश्यादलाल गिता रामकुमार वर्मा वय २० वर्ष रा. काशिमीरा मुळ रा. छत्तीसगड ही वेश्यागमनासाठी ग्राहकांकडुन पैसे स्विकारुन मुली पुरवित असतांना मिळुन आल्याने तिचेकडून वेश्यगमनाकरीता स्विकारलेल्या रक्कमेसह ताब्यात घेवुन ०२ मुर्लीची सुटका करण्यात आली आहे. सदर बाबत महिला वेश्यादलाल हिचेविरुध्द नवघर पोलीस ठाणे येथे पो.हवा. २२६९ उमेश पाटील यांनी सरकार तर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन गुरनं. I ४५२/२०२१ भा.दं.वि.सं. कलम ३७० सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४, ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई डॉ. श्री महेश पाटील, पोलीस उप. आयुक्त (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर विभागाचे व.पो.नि. श्री. संपतराव पाटील, पोहवा. २२६९ उमेश पाटील, रामचंद्र शिवाजी पाटील, म.पो.ना.१७८९ यम्बर, कमल चव्हाण, पो.शि. ३६६० केशव शिंदे, चालक पोना. २६३८ गावडे यांनी केली आहे.

------oooo-----